|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव- ४२५००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON – 425001

'A' Grade
NAAC Re- Accredited
(3rd Cycle)

जा.क्र.उमवि/२१/अभ्यासमंडळ/ चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम ६२० /२०१८ दिनांक : १७.०७.२०१८

**परीपत्रक क्र.२०० /२०१८**

**प्रति,**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी सर्व
संलग्नीत कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालयांचे मा.प्राचार्य यांना..

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष बी.ए. / बी.कॉम. / बी.एस्सी. साठी चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम लागू करणेबाबत...

**महोदय,**

वरील विषयांस अनुसरुन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातंर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष बी.ए./ बी.कॉम. / बी.एस्सी. साठी चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम लागू करण्यासंदर्भात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानवविज्ञान विद्याशाखा व आंतरविद्याशाखीय अभ्यासविद्या शाखेंतर्गत येणा-या सर्व संबधीत अभ्यासमंडळांचे सभांचे आयोजन मा.प्र.अधिष्ठातांच्या अध्यक्षतेखालील करण्यात आले होते. या सभेसाठी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानवविज्ञान विद्याशाखा व आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेंतर्गत येणा-या सर्व विषयांचे अभ्यासमंडळाचे अध्यक्ष उपस्थित होते.तेव्हा अभ्यासमंडळाच्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष बी.ए. / बी.कॉम. / बी.एस्सी. साठी चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम (Choise Base Credit System) लागू करण्यात यावा निर्णय घेण्यात आलेला आहे.त्या दृष्टीने त्या-त्या अभ्यासमंडळांनी प्रथम वर्ष बी.ए/बी.कॉम/बी.एस्सीचे अभ्यासक्रम हे चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम प्रमाणे तयार करुन दिलेले असून अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेत स्थळावर टाकण्यात (Up Load) करण्यात आले आहे.

मला प्राप्त झालेल्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातंर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सर्व कला, वाणिज्य व विज्ञान वर्गांच्या प्रथम वर्ष बी.ए. /बी.कॉम./ बी.एस्सी. साठी चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम लागू करण्यात आलेली आहे याची नोंद घेऊन सदरची बाब आपल्या अधिनिस्त अध्यापक, कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी आणि सर्व संबंधीत विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

(अनिल चिं मनोरे)
उपकुलसचिव
अभ्यासमंडळ व पात्रता विभाग

**प्रत माहितीसाठी :**

१. मा.कुलगुरु कार्यालय, उमवि, जळगांव २.मा.संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, उमवि.जळगांव
३. मा.उपकुलसचिव / सहा.कुलसचिव, मानवविज्ञान अभ्यासमंडळ, परीक्षा विभाग, उमवि,जळगांव
४.संगणक केंद्र प्रमुख,परीक्षा विभाग, उमवि,जळगांव ५.समन्वयक, ई- सुविधा विद्यार्थी सहायता केंद्र, उमवि, जळगांव

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## अभ्यासमंडळ विभाग

जा.क्र.कबचौउमवि/२१/अमंवि/३३६ /२०१९ दि.०२.०८.२०१९

# परीपत्रक क्र.१२६/ २०१९

(सुधारीत)

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित,
सर्व कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य यांना..

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून मानव्य विज्ञान विद्या शाखेतंर्गत एस.वाय.बी.ए वर्गाचे (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) च्या **संरचना (सुधारीत) (Revised Structure)** बाबत.

**महोदय / महोदया ,**

आपणास विदितच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांकरीता **Choice Based Credit System** लागू केली आहे. त्या अनुषंगाने, नैसर्गिक दृष्टया शै.वर्ष १९-२० साठी व्दितीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गां करीता **Choice Based Credit System** लागू करण्यात आली आहे.

त्या अनुषगांने, शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून **मानव्य विज्ञान** विद्या शाखेतंर्गत **एस.वाय.बी.ए** वर्गाचे (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) **संरचना** (Structure) परिपत्रक क्र.११२ /२०१९, दि.१०.०६.२०१९रोजी जा.क्र.कबचौ उमवि /२१/अमंवि /२३९ /२०१९, दि.१०.०६.२०१९ अभ्यासमंडळ विभागाकडून कळविण्यात आले आहे.

तदनंतर दि.२१.०६.२०१९ रोजी **मा.प्राचार्य डॉ.प्रमोद एम पवार,** प्र.अधिष्ठाता, मानव्य विज्ञान विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या **मानव्य विज्ञान** विद्याशाखेतील सर्व विषयांच्या अभ्यासमंडळांच्या अध्यक्षांच्या सभेत शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून **मानव्य विज्ञान** विद्या शाखेतंर्गत **एस.वाय.बी.ए** वर्गाचे (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) च्या **संरचना (सुधारीत) ( Revised Structure )** तयार करण्यात आले आहे.

तरी, शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून **मानव्य विज्ञान** विद्या शाखेंतर्गत **एस.वाय.बी.ए** वर्गाचे (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) च्या **संरचना (सुधारीत) (Revised Structure)** सोबत जोडून पाठवित आहोत.कृपया सदरची बाब आपल्या अधिनस्थ अध्यापक, कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी तथा संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

सोबत

आपला विश्वासू,

**( अनिल सी. मनोरे )**
उपकुलसचिव
अभ्यासमंडळ व प्रवेश, पात्रता विभाग

**सोबत :** एस.वाय.बी.ए (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) चे संरचना (सुधारीत) (Revised Structure) आणि समकक्ष विषय ( Equivalnce Subject )

**प्रत माहितीसाठी :**

१.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगांव
२.मा.उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगांव
३.मा.उपकुलसचिव, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगांव
४. मा.उपकुलसचिव / सहा.कुलसचिव, मानव्य विज्ञान विभाग, परीक्षा विभाग, कबचौउमवि, जळगांव
५.संगणक केंद्र प्रमुख,परीक्षा विभाग, कबचौउमवि, जळगांव
६.समन्वयक, ई- सुविधा विद्यार्थी सहायता केंद्र, कबचौउमवि, जळगांव

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## अभ्यासमंडळ विभाग

जा.क्र.कबचौउमवि/२१/अमंवि/२४२/२०१९ दि.११.०६.२०१९

## परीपत्रक क्र.११३/ २०१९

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित,
सर्व कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य यांना..

**विषय :-** **विज्ञान व तंत्रज्ञान** विद्या शाखेतंर्गत **प्रथम वर्ष विज्ञान** (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) च्या **संरचना (Structure)** (सुधारीत) आणि **व्दितीय वर्ष विज्ञान** (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) च्या **संरचना (Structure)** बाबत.

**महोदय / महोदया ,**

आपणास विदितच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गा करीता **Choice Based Credit System** लागू केलेली आहे. त्या अनुषंगाने नैर्सगिक दृष्टया शै.वर्ष १९-२० साठी व्दितीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गाकरीता **Choice Based Credit System** लागू करण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून **विज्ञान व तंत्रज्ञान** विद्या शाखेतंर्गत **व्दितीय वर्ष विज्ञान** (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) ची **संरचना (Structure) मा.प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील,** प्र.अधिष्ठाता, **विज्ञान व तंत्रज्ञान** विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली **विज्ञान व तंत्रज्ञान** विद्याशाखेंतर्गत येणा-या अभ्यासमंडळांच्या अध्यक्षांच्या सभेत मंजुर करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने शै.वर्ष २०१९-२० पासून **व्दितीय वर्ष विज्ञान** (S.Y.B.Sc) साठी लागू करण्यात येत असलेले **संरचना (Structure)** आणि **प्रथम वर्ष विज्ञान** (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) च्या **संरचना (Structure)** (सुधारीत) सोबत जोडून पाठवित आहोत.कृपया सदरची बाब आपल्या अधिनस्थ अध्यापक, कार्यालयीन अधिकारी /कर्मचारी तथा संबधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे

**आपला विश्वासू,**

**( अनिल सी. मनोरे )**
उपकुलसचिव
अभ्यासमंडळ व प्रवेश, पात्रता विभाग

**सोबत :** एस.वाय.बी.एस्सी (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) आणि एफ.वाय.बी.एस्सी (चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम) चे संरचना (Structure) ( सुधारीत )

**प्रत माहितीसाठी :**

१.मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगांव
२.मा.उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगांव
३.मा.उपकुलसचिव, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगांव
४. मा.उपकुलसचिव / सहा.कुलसचिव, मानव्य विज्ञान विभाग, परीक्षा विभाग, कबचौउमवि, जळगांव
५.संगणक केंद्र प्रमुख,परीक्षा विभाग, कबचौउमवि, जळगांव ६.समन्वयक, ई- सुविधा विद्यार्थी सहायता केंद्र, कबचौउमवि, जळगांव

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**अभ्यास मंडळ विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/२१/अभ्यासमंडळ/५ /२०२१ दिनांक : ०९.०१.२०२०

## * सुधारीत पत्र *

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी सर्व
संलग्नीत कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना..

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून तृतीय बी. एस्सी् (C.B.C.S.) वर्गासाठी **Sem-V** च्या विद्यार्थ्यांना **Non Credit Audit Course** अभ्यासक्रम लागू करणेबाबत...

**संदर्भ** :- जा.क्र. कबचौउमवि/२१/अभ्यासमंडळ/०३/२०२१, दिनांक : ०५.०१.२०२०

**महोदय/महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव च्या सर्व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम आणि बी.एस्सी, शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून द्वितीय वर्ष बी.ए., बी.कॉम आणि बी.एस्सी् आणि शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून तृतीय वर्ष बी.ए., बी.कॉम आणि बी.एस्सी् वर्गांना **Choise Based Credit System** (पसंतीवर आधारीत श्रेयांक पध्दती) नुसार अभ्यासक्रम लागू करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून तृतीय वर्ष बी.ए., बी.कॉम आणि बी. एस्सी् मधील सत्र-५ च्या विद्यार्थ्यांसाठी **Audit Course NSS AC 501 (A), NCC AC 501 (B), Sports AC 501 (C)** हे तीन **Non Credit Audit Course** समाविष्ट करण्यात आले आहेत असे जा.क्र. कबचौउमवि/२१/अभ्यासमंडळ/०३/२०२१, दि.०५.०१.२०२१ अन्वये कळविण्यात आले आहे.

तथापि, आज दि.०९.०१.२०२१ रोजी मा.प्र.कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत मा.प्राचार्य महोदयांशी झालेल्या सुवांद आणि चर्चेच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून फक्त तृतीय बी.एस्सी् **(C.B.C.S.)** वर्गासाठी **Sem-V** च्या विद्यार्थ्यांना **Non Credit Audit Course** अभ्यासक्रम लागू करण्यात येत आहे.

**Audit Course बाबत मार्गदर्शक सूचना :-**

1. महाविद्यालयातील शैक्षणिक विभागातून विद्यार्थ्यांची यादी प्राप्त करुन संबंधित **Audit Course** चे नियोजन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध अभ्यासक्रमानुसार महाविद्यालयातील संबंधित **NSS, NCC, Sports** विभागाने पूर्ण करावे.
2. संबंधित **Audit Course** चे **COVID-19**' महामारीच्या, टाळेबंदी मुळे विद्यापीठाने निर्देशित केलेल्या परिपत्रकानुसार **Work from home** अन्वये **Online** अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे नियोजन करावे.
3. **Audit Course** शी निगडीत विविध प्रक्रियाबाबत **(Activities)** थोडक्यात इतिहास, कौशल्य, नियमावली इ. बाबी विषयी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार अवगत करावे.

अंतरी पेटवू ज्ञानज्योत

..२..

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## अभ्यासमंडळ विभाग

जा.क्र. कबचौउमवि/२१/पदव्यूत्तर अभ्यासक्रम /१८४/२०२० दि. २७.०७.२०२०

**प्रति,**

**कबचौउमवि. संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था,**

**यांचे मा. प्राचार्य / मा. संचालक / विभागप्रमुख,**

**यांना..**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये **पदव्यूत्तर** (एम.एस्सी् /एम.ए/ एम.कॉम भाग -१) अभ्यासक्रम आणि **एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१,** वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्याबाबत..

**महोदय/ महोदया,**

आपणास विदीतच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांकरीता **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S)** व शै.वर्ष १९-२० पासून व्दितीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान च्या वर्गा करीता **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S)** लागू करण्यात आली असून नैसर्गिक दृष्टया शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञानच्या वर्गांकरीता **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S)** लागू करण्यात येत आहे.

या अनुषंगाने आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून **एम.एस्सी् / एम.ए / एम.कॉम भाग -१, एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१** या वर्गांचे अभ्यासक्रम बदलणार होते.

परंतु शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांकरीता **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S)** अभ्यासक्रम लागू होत असल्याने या वर्गांचे विद्यार्थी **शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१** मध्ये **C.B.C.S** नुसार अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत. त्यामुळे अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी **शैक्षणिक वर्ष २०२१-२१** मध्ये पदव्यूत्तर अभ्यासक्रम **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती** नुसार तयार करणे आवश्यक आहे.

तेव्हा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षांत घेवून, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये **पदव्यूत्तर** (एम.एस्सी् /एम.ए/ एम.कॉम, भाग-१) वर्गांच्या अभ्यासक्रमांसह **एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१,** वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त बाब, आपल्या महाविद्यालयांतील अधिनिस्थ असलेले अध्यापक, प्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001 (INDIA)

आपला विश्वासू,

**कक्ष अधिकारी**

अभ्यास मंडळ व प्रवेश पात्रता विभाग

**सोबत :** अभ्यासक्रमांची यादी .

**प्रत माहितीसाठी :**-१) मा. कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. २) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.३) मा.प्र.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ४) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ५) मा.जनसंपर्क अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ६) ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## अभ्यासमंडळ विभाग

जा.क्र. कबचौउमवि/२१/प्रथम वर्ष बी.ए-बी.कॉम-बी.एस्सी अभ्यासक्रम/३९/२०२१ दि. १५.०६.२०२१

**प्रति,**
**कबचौउमविशी संलग्नीत**
**सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे**
**मा. प्राचार्य यांना..**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रथम वर्ष बी.ए , बी.कॉम आणि बी.एस्सी (पसंतीवर आधारीत श्रेयांक पध्दती) (C.B.C.S) पदवी वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्याबाबत..

**महोदय/ महोदया,**

आपणास विदीतच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांकरीता **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्दती** (C.B.C.S) लागू केली आहे. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांचे विद्यार्थी पदवी घेऊन उत्तीर्ण होणार आहे.

या अनुषंगाने, नैसर्गिक रित्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान अभ्यासक्रम बदलणार होता परंतू शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये **एम.एस्सी / एम.ए / एम.कॉम भाग -१, एम.बी.ए भाग-१,एम.एम.एस(कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१),एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१** वर्गांचे अभ्यासक्रम **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्दती** ( C.B.C.S) लागू करण्यात येत आहे.

या शिवाय कोविड-१९ चा प्रादुर्भावामुळे प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान अभ्यासक्रम पुनर्रचना पुढच्या वर्षी (शैक्षणिक वर्ष २०२२-२३) करावी अशी शिफारस मा.प्रभारी अधिष्ठाता यांनी एकमताने केली. ही शिफारस दि.२७.०५.२०२१ रोजी झालेल्या मा.विद्या परिषद ऑनलाईन सभेत विचारार्थ ठेवण्यात आली असता. सभेत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**ठराव वि.प.ए-५२ /२०२१, दि.२७.०५.२०२१**

**क.ब.चौ.उ.म.वि. अंतर्गत येणा-या सर्व कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयांसाठी शै.वर्ष २०१८-१९ मध्ये लागू करण्यात आलेला प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गाचा पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्दती (C.B.C.S) अभ्यासक्रम हा शैक्षणिक वर्ष २१-२२ करीता जशाचा तसा लागू करण्याबाबत मा.अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशींच्या अधिन राहून मान्यता द्यावी, असे सर्वानुमते ठरले.**

तेव्हा वरील ठरावाच्या अनुषंगाने, आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रथम वर्ष बी.ए , बी.कॉम आणि बी.एस्सी (पसंतीवर आधारीत श्रेयांक पध्दती) (C.B.C.S) पदवी वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्यात येत आहे.

तरी उपरोक्त बाब, आपल्या महाविद्यालयांतील अधिनिस्थ असलेले अध्यापक, प्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिकारी /कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

**कक्ष अधिकारी**
अभ्यास मंडळ व प्रवेश पात्रता विभाग

**प्रत माहितीसाठी :**१) मा. कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
२) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
३) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव.
४) मा.प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानव्यविज्ञान विद्याशाखा, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
५) ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

## प्रवेश व पात्रता विभाग

जा.क्र. कबचौउमवि/२१/अ.मंडळ/ २६९ /२०२३ दि.२५.०८.२०२३

## परिपत्रक क्र.३०/२०२३

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे मा.प्राचार्य / संचालक.

२) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा / परिसंस्था / विभाग यांचे मा.संचालक/ विभागप्रमुख.

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमांबाबत..

**महोदय / महोदया,**

आपणास विदीतच आहे की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासूनकवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी करण्याचे निश्चित केले आहे.त्या अनुषंगाने दि.१६.०५.२०२३ च्या शासनाच्या निर्देशा नंतर, दि.१६.०६.२०२३ रोजी शासनाकडून प्राप्त झालेल्या पत्रातील सुधारीत शिफारशीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करावयाच्या अभ्यासक्रमांसाठी वेळोवेळी त्या-त्या विषयांसाठी अभ्यासक्रमांच्या सभा घेण्यात आल्या.सभेत अभ्यासक्रम तयार करणेसंदर्भात दिलेल्या सुचनांप्रमाणे त्या-त्या अभ्यासमंडळांनी आपापल्या विषयांचे अभ्यासक्रम तयार करुन अभ्यासकम लागू करण्याची शिफारस मा.विद्याशाखा ( Faculty ) केली.त्यानंतर संबंधीत विद्याशाखांनी सर्व अभ्यासक्रमांची मान्यतेची शिफारस मा.विद्या परिषद सभेपुढे केली.

तेव्हा दि.१८, जुलै २०२३ रोजी झालेल्या मा.विद्या परिषद सभेने अनुक्रमे ठराव क्र.ए-७६/२०२३,ठराव क्र.ए-८४/२०२३, ए-११३/२०२३, ए-११४/२०२३, ए-११५/२०२३ आणि ए-११६/२०२३ मान्यता दिली आहे.तपशिल खालीलप्रमाणे :

**University Schools & Depts**

| अभ्यासक्रमांची नावे | अभ्यासक्रमांची नावे |
|---|---|
| **School of Computer Sciences** | **School of Physical Sciences** |
| A.Y 2023-24 F.Y B.Sc Computer Science NEP-2020 | A.Y. 2023-24 M.Sc Electronics ( Part-I & II ) NEP-2020 |
| A.Y 2023-24 M.Sc Computer Science (Part-I & II) NEP-2020 | A.Y. 2023-24 M.Sc Matreial Science ( Part-I & II ) NEP-2020 |
| A.Y 2023-24 M.Sc Information Technology (Part-I & II) NEP-2020 | A.Y. 2023-24 M.Sc Energy Studies ( Part-I & II ) NEP-2020 |
| **School of Mathematical Sciences** | **School of Enviornment Sciences** |
| A.Y 2023-24 B.Sc Mathematical Sciences Major-Actuarial Science and Minor-Economics (NEP-2020 ) | A.Y 2023-24 M.Sc I Applied Geography (NEP-2020 ) |
| A.Y 2023-24 B.Sc Mathematical Sciences Major-Statistics and Minor-Data Science (NEP-2020) | A.Y 2023-24 M.Sc I Enviornmental Science (NEP-2020 ) |
| A.Y 2023-24 B.Sc Mathematical Sciences Major-Statistics and Minor-Economics (NEP-2020) | A.Y 2023-24 M.Sc I Applied Geology (NEP-2020 ) |
| A.Y 2023-24 M.Sc I Mathematics (with Specialization in Computational Mathematics)(NEP-2020) | **School of Life Sciences** |
| A.Y 2023-24 M.Sc I Industrial Statistics (NEP-2020) | A.Y 2023-24 M.Sc I Biochemistry (NEP-2020) |
| **School of Chemical Sciences** | A.Y 2023-24 M.Sc I Biotechnology (NEP-2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Polymer Chemistry (NEP-2020) | A.Y 2023-24 M.Sc I Microbiology (NEP-2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Organic Chemistry(NEP-2020 ) | **School of Arts & Humanities** |
| A.Y 2023-24 M.Sc I Physical Chemistry (NEP-2020 ) | A.Y 2023-24 M.A I Defence Studies ( NEP-2020 ) |
| A.Y 2023-24 M.Sc I Agrochemicals and Pesticides (NEP-2020 ) | A.Y 2023-24 M.A I Dramatics ( NEP-2020 ) |
| A.Y 2023-24 M.Sc I Industrial_Chemistry (NEP-2020 ) | A.Y 2023-24 M.A I Music ( Tabla) ( NEP-2020 ) |
| A.Y 2023-24 M.Sc I Analytical Chemistry (NEP-2020 ) | A.Y 2023-24 M.A I Music ( Vocal) ( NEP-2020 ) |
| **School of Social Sciences** | A.Y 2023-24 M.LIB I ( NEP-2020 ) |
| A.Y 2023-24 M.A. I Sociology (NEP-2020) | A.Y 2023-24 M.A I Psychology (NEP-2020 ) |
| A.Y 2023-24 M.A. I Economics (NEP- 2020) | **School of Languages Studies & Research Centre)** |
| A.Y 2023-24 M.A. I History (NEP- 2020) | A.Y 2023-24 M.A. Marathi ( Part-I & II) NEP-2020 |
| A.Y 2023-24 M.A. I Political Scineces ( NEP- 2020) | A.Y 2023-24 M.A. English (Part-I & II) NEP-2020 |
| A.Y 2023-24 M.A. I Pub. Admini.(NEP- 2020) | A.Y 2023-24 M.A. Hindi (Part-I & II) NEP-2020 |
| A.Y 2023-24 M.A I Dr.Ambedkar Thoughts ( NEP-2020) | **School of Management Studies** |
| A.Y 2023-24 M.A I Womens Studies( NEP-2020) | A.Y 2023-24 B.B.A ( Management ) (NEP 2020) |
| A.Y 2023-24 F.Y.B.A (NEP- 2020) | |

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव-४२५००१ 1990 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

| School of Media | University Institute of Chemical Technology |
|---|---|
| A.Y 2023-24 M.A M.C.J (NEP-2020) | A.Y 2023-24 B.Tech. (Chemical Engineering) ( NEP 2020) |
| A.Y 2023-24 Camera Handling (NEP-2020) | A.Y 2023-24 B. Tech. (Food Technology) ( NEP 2020) |
| A.Y 2023-24 CNP - Newspaper Pagination (NEP-2020) | A.Y 2023-24 B. Tech. (Oil Technology) ( NEP 2020) |
| A.Y 2023-24 CRJ - Radio Jockey (NEP-2020) | A.Y 2023-24 B. Tech. (Paint Technology) ( NEP 2020) |
| A.Y 2023-24 CVE - Video Editing (NEP-2020) | A.Y 2023-24 B. Tech. (Plastic Technology) ( NEP 2020) |
| A.Y 2023-24 CWN - Writing for Newspaper (NEP-2020) | |
| A.Y 2023-24 DSM – Digital &Social Media (NEP-2020) | |

**Affiliated Colleges Syllabus**

| Faculty of Science & Technology (Science) | Faculty of Commerce & Management |
|---|---|
| A.Y 2023-24 F.Y.B.C.A 101 (Revised ) (CBCS Pattern) | A.Y 2023-24 S.Y.B.Com (Paper 305) Computer Management |
| A.Y 2023-24 F.Y.B.Sc ( Data Science ) | A.Y 2023-24 B.B.A (E-Commerce) (NEP 2020) |
| A.Y 2023-24 S.Y.B.C.A ( CBCS Pattern ) | A.Y 2023-24 M.Com I (NEP 2020) |
| A.Y 2023-24 S.Y.B.Sc I Statistics ( CBCS Pattern ) | A.Y 2023-24 M.M.S (Structure) Computer Management |
| A.Y 2023-24 S.Y.B.Sc I Electronics ( CBCS Pattern ) | A.Y 2023-24 M.B.A Financial Technology (60/40 Pattern) |
| A.Y 2023-24 M.Sc I Mathematics (NEP 2020) | A.Y 2023-24 M.B.A (Health Care & Hospital Management (60/40 Pattern) |
| A.Y 2023-24 M.Sc I Statistics (NEP 2020) | **Faculty of Humanities** |
| A.Y 2023-24 M.Sc I Physics (NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I Marathi (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Chemistry (NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I Hindi (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Botany (NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I English (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Zoology ( NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I History (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Geography ( NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I Economics (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Computer Science ( NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I Political Science (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Information Technology NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I Psychology (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Microbiology (NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I Defence&Stratigic Studies (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Biochemistry (NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I Sociology (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Biotechnology (NEP 2020) | A.Y 2023-24 M.A I Urdu (NEP 2020) |
| A.Y 2023-24 M.Sc I Electronics (NEP 2020) | |
| A.Y 2023-24 M.C.A ( Integrated ) (NEP 2020) | |

तेव्हा सदरची बाब आपले अधिनिस्थ असलेले अध्यापक, प्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिकारी /कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

( राजेश चि.ठाकरे )
सहायक कुलसचिव
(अति.कार्यभार)
प्रवेश, पात्रता व अभ्यासमंडळ विभाग

**प्रत माहितीसाठी** :- १) मा.कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
३) मा.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
४) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
५) मा.वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
६) ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.